# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ११/०५/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो. स्टे. मौदा** :– फिर्यादी नामे– सौ बिंदीया स्वप्नील धारगावे रा. केसलापुर मौदा व आरोपी नामे १) पति– स्वप्नील धारगावे रा. केसलापुर मौदा हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत केसलापुर मौदा येथे दिनांक २०.०६.२०२१ चे ०३.३० ते १०.०५.२२ चे ००.३० वा. पर्यंत आरोपी क्र. १ हा दारू पिण्याच्या सवयीचा असुन त्याने दि २०.०६.२०२१ चे ०३.३० वा. फिर्यादीला शिवीगाळ करून मारपीट केली. यानंतर आरोपीने 'तुझा बापानी लग्नामध्ये मला काय दिले' असे म्हणुन 'तु तुझा वडीलांच्या घरून पैसे आण' असे म्हणुन फिर्यादीला मानसीक व शारीरिक त्रास देत होता. तसेच आरोपी क्र. २) दिव्यरत्ना धारगावे रा केसलापुर मौदा ही नेहमी आरोपी क्र. १ यास 'तु फिर्यादीला तलाक दे, मी तुझे दुसरे लग्न करून देते' असे म्हणते व आज रोजी आरोपी क्र १ याने फिर्यादीला तलाक मागुन शिवीगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ४९८ (अ), ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा काळे मो.नं. ९८२२५४९६९५ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. नरखेड** :– अंतर्गत सावरगाव ते काटोल रोड सावरगाव शिवार येथे दिनांक १०/०५/२०२२ चे १५:०० वा. सुमारास दिपक ईमरत टेकाम (मृतक) वय २१ वर्ष रा वडली वाघ,काटोल हा एमएच–४०/बीडब्ल्यु– २०१३ क्रमांकाच्या मोटार सायकल ने सावरगाव वरून काटोल कडे जात असता काटोल वरून सावरगाव कडे येणारी सिजी–१०/डी– २६४७ क्रमांकाची फोर व्हीलर ईनोव्हाचे वाहन चालक आरोपीने आपले वाहन हयगईने व निष्काळजीपणे चालवून मोटरसायकला समोरून धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक दिपक टेकाम हा रोडवर पडुन त्याला मार लागुन तो मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ईमरत सजन टेकाम वय ४८ वर्ष रा वडली वाघ, काटोल जि नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री गावंडे मो.क्र. ८४२४०४३१३५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**